Dear Sandhya,
Sending this draft on Corruption.
Dr.Rajiv Sharangpani

## भ्रष्टाचार : सृजन की सर्वनाश ?

भ्रष्टाचार ही आता एक समाजव्यवस्था झाली आहे हे नाकारण्यात आता अर्थ उरलेला नाही. भ्रष्ट नाही असा माणूस भारतदेशात सापडणे जरा कठीणच आहे. उच्चपदस्थांपासून ते कनिष्ठपदस्थ ापर्यंत आणि तोफांपासून ते टाचण्यांपर्यंत भ्रष्टाचार होतो आहे. त्याच्याविरुध्द अनेक उपाययोजना केल्या जात आहेत आणि त्या उपाययोजना राबविणारेच भ्रष्ट असल्याचा बभ्रा होतो आहे. पण
तरीही आपले रहाटगाडगे फिरतेच आहे. म्हणजे काही आफ्रिकन देशात लोक अन्नान्न होऊन मरताहेत अशा थराला भारतात भ्रष्टाचार पोचला नाही आहे. म्हणजे भ्रष्टाचारदेखील समाजव्यवस्थेचा एक महत्वाचे अंग बनून समजव्यवस्थेला पोषकच ठरतो आहे. आफ्रिकन देशांप्रमाणे समाजव्यवस्थाच मोडून काढीत नाही आहे.
आमच्या एका मित्रानी सांगितलेली गोष्ट फार चिंतनीय आहे. ते एकदा आपली बिले कां मंजूर होत नाहीत हे पाहण्यासाठी एका सरकारी उद्योगाच्या कचेरीत गेले.बिले मंजूर करणाऱ्या माणसाने त्यांचे आडनाव ऐकल्यावर विचारले ," अप्पांचा मुलगा का रे तू ?" मित्र म्हणाले "हो" त्यावर ते गृहस्थ म्हणाले,"माझी कामाची एक पध्दत आहे. मी कोणतेही बिल मंजूर करायला दहा रुपये घेतो. मग ते बिल एक रुपयाचे असो की एक कोटी रुपयाचे असो. तसेच मी कुणालाही ह्यात सूट देत नाही, तुलाही नाही. मी रोज अत्यंत वेळेवर येतो. कधीही सुटी घेत नाही आणि माझे टेबल सोडत नाही. माझे काम मी अत्यंत कार्यक्षमतेने करतो." मित्रांनी दहा रुपये देऊन बिल मंजूर करून घेतले. पुढे हे गृहस्थ निवृत्त झाल्यावर त्यांनी सर्वांना घरी बोलावले तेव्हा दहा रुपयांच्या नोटांचा हार घालून त्यांचा संबंधितांनी सत्कार केला.
आता ह्या गृहस्थांना भ्रष्ट म्हणायचे कां नाही. एक गोष्ट नक्की की ते हावरट नाहीत.आपल्या कामाच्या बाबतीत ते दक्ष आहेत. फक्त दहा रुपयात ते सर्वांची कामे करून देतात. आपण जे

काम करतो त्याचे महत्व आपल्याला मिळणाऱ्या पगारापेक्षा जास्त आहे हे त्यांना माहिती आहे.



पण म्हणून ते टक्केवारीने पैसे घेत नाहीत. म्हणजे शंभर रुपयाच्या बिलाला एक रुपया, हजाराच्या बिलाला दहा, लाखाच्या शंभर असे ते करीत नाहीत. नियमानुसार ते भ्रष्ट ठरतीलच पण नियम पाळतील तर ते भारतीय कसले ? आपण साधे रहदारीचे नियम की जे पाळले नसता आपल्या अगर दुसऱ्याच्या जिवावर बेतू शकते पाळत नाही.

आपली मजा अशी आहे की लोक नियम पाळतात की नाही हे बघणारे लोक हे पुन्हा आपल्यातलेच ा असल्याने तेही नियमानुसार वागतीलच असे नाही. म्हणजे पुन्हा त्यांच्यावर लक्ष ठेवणारे नेमणे आले असे अनंत होत जाणार.म्हणजे पुन्हा परिस्थिती जैसे थे. मग असे म्हणू या की भ्रष्टाचार हा मानण्यावर आहे. आपण भारतीयांनी उगाच कुणाकडे बोटे दाखवून हा भ्रष्ट, ही भ्रष्ट असे म्हणण्यातच काही अर्थ नाही. एक रुपया खाल्ला काय आणि शंभर कोटी खाल्ले काय वृत्ती तीच. शेण किती खाल्ले यापेक्षा खाल्ले हे महत्वाचे. पैसा मिळवा पैसा खर्च करा. कारण कितीही पैसे मिळवले आणि खर्चच केले नाहीत तर ते पैसे असून नसल्यासारखेच. आणि खर्च केलेत तर म ग दुसऱ्याला दिलेच म्हणजे पुन्हा तुमचे राहिले नाहीतच. पैसा फक्त देण्याच्या क्षणापुरता आपला असतो दिल्याक्षणी दुसऱ्याचा होतो. येवढे लक्षात आल्याशी कारण.

पैशासंबंधी आपली दुटप्पी वृत्ती अगदी स्पष्ट आहे. अध्यात्मिक अगर धार्मिक प्रवचनात पैशाची यथेच्छ निंदानालस्ती ऐकायची. घरी आल्या आल्या रिक्षावाल्याशी एक रुपयावरून हुज्जत घालायची. वर्तमानपत्रात भ्रष्टाचाऱ्यांविषयी वाचले की सात्विक संतापाने " फासावर लटकवले पाहिजे साल्यांना" असे म्हणायचे आणि कामावर गेले की शांतपणे पैसे खायचे अगर काळे पैसे करायचे, पावत्या फाडायच्या नाहीत इत्यादी गोष्टी बिनदिक्कत करायच्या. प्रवचन ऐकणारेच काय देणारे देखील भ्रष्ट असतातच. आत्ताच आपण पैशाची यथेच्छनिंदानालस्ती केली आणि आता लगेचच प्रवचनाचा गल्ला किती जमला हे आपण पाहतो आहोत हे त्यांच्या ध्यानातही येत नाही.

तर ह्या भ्रष्टाचाराच्या किडीने सारा समाज पोखरला गेला आहे हे आपण जर वारंवार शंख

करून एकमेकाला सांगत असू आणि आपल्या वृत्तीतच भ्रष्टाचार आहे हे आपण मान्य करीत असू तर ह्या किडीने सर्वनाश होण्याचे टाळून आपण ह्या किडीचाच सृजनात्मक उपयोग करून घेतला पाहिजे. त्यासाठी आपण खालील गोष्टींवर नीट विचार केला पाहिजे.

ज्याप्रमाणे बहुसंख्य लोकांना मद्य, मांस आणि मैथुन ह्यासाठी उद्युक्त करावे लागत नाही त्याचप्रमाणे बहुसंख्य लोकांना पैसे हे जितके जास्त मिळतील तितके हवेसे वाटतात. तसेच बहुसंख्य लोक हे आपल्याकडील पैसे आपल्या गरजेपेक्षा जरी जास्त असले तरी ते गरजवंताला आपणहून देऊ इच्छित नाहीत. सरकारला तर अजिबातच नाही. असुरक्षितता हे ह्या सर्व गोष्टीच ो मूळ आहे आणि सध्या समाजजीवन अधिकाधिक असुरक्षित करण्यात आपण सर्वच हातभार लावीत असल्याने ही भावना वाढतीच राहणार. त्यातच कधीकधी काळा पैसा बाहेर काढण्यासाठ ी सरकारच विविध रोखे काढून त्याला राजमान्यता देत असल्याने काळा पैसा कधीही पांढरा हो ऊ शकतो असे सामान्यजनांना वाटते. ह्या गोष्टी लक्षात घेतल्या म्हणजे उपाय लगेच लक्षात येत ील.

पहिले म्हणजे सर्व सरकारी खात्यात काम करण्यासाठीची वरकड रक्कम नीट ठरवून देणे आवश्यक आहे. सध्या त्याला काही ताळतंत्रच नाही. त्यामुळे कोणत्या कामासाठी किती पैसे वर द्यावे लागतात हे पामरांना कळत नाही आणि गैरसमज, अडवणूक कामाला विलंब आणि एकंदरी त वैयक्तिक मनस्ताप, पर्यायाने सामाजिक असंतोष. आपण एक उदाहरण घेऊ या. समजा एखाद्या

सरकारी कचेरीत आपल्याला काही काम आहे. आपण गेल्यावर कोणत्या टेबलावर आपले काम होईल हे आपल्याला कळण्यातच फार वेळ जातो. त्यात आपल्याला फसवायला टपलेले लोक असतातच. म्हणून काय करायचे की कुणी कुठे जावे हे सांगायला एक माणूस बसवायचा आणि त्या माणसाला पगाराव्यतिरिक्त पैसे घ्यायला परवानगी द्यायची. प्रत्येक माणसाकडून किती पैस े घ्यायचे हे ठरवून द्यायचे. रोज समजा शंभर लोक कचेरीत येतात आणि त्याला प्रत्येकाकडून पांच रुपये घ्यायला परवानगी दिली तर रोजचे पांचशे रुपये त्याला मिळतील. समजा त्याची हांव ा जास्त आहे तर त्याने आपल्या वरिष्ठाकडून तशी परवानगी घ्यायची. नंतर आपण त्या टेबलावर गेलो तर तिथल्या माणसाने प्राथमिक काम केले की त्याला वीस रुपये द्यायचे. नंतर

साहेबाकडे सहीला गेले की साहेबाला शंभर रुपये द्यायचे. साहेबाने ह्या शंभर रुपयातील काही भाग ज्यांना अशी कमाई करण्याची संधी मिळू शकत नाही अशा आपल्या इतर सहकाऱ्यांसाठी ठेवायचा. आणि उरलेला आपण घ्यायचा. सर्व सरकारी कचेऱ्यांना पंधरा ऑगस्ट, सव्वीस



जानेवारी आणि शनिवार रविवार ह्या व्यतिरिक्त सुट्या बंद करायच्या. पैसे बुडतील म्हणून कर्मच
ारी दांड्या मारणार नाहीत. जितके जास्त काम करू तितके जास्त पैसे मिळतील म्हणून सर्व ज
ण झटून कामे करतील. मात्र प्रत्येक सरकारी कचेरीतल्या भिंतीवर दोन डोळे काढून त्याखाली "निगाहे करम" म्हणजे आपल्या कर्माकडे लक्ष असू दे एवढेच लिहायचे म्हणजे नियमापेक्षा जास्त पैसे खाणाऱ्याना जरा आठवण होईल.

ह्या यंत्रणेचा सर्वात मोठा फायदा हा झारीतील शुक्राचार्यांना होईल. म्हणजे सरकारी कचेऱ्यात असे काही लोक असतात की ज्यांना पैसे खायचे धैर्य नसते. हे लोक पैसेही खात नाहीत आणि कामेही करीत नाहीत. आपला हा नैतिक अहंकार कुरवाळत चडफडत बसतात आणि लोकांना अतोनात त्रास देतात. या लोकांना उघडउघड उत्पन्नाचे साधन मिळेल आणि झारीचे तोंड मोकळे होऊन प्रगतीचे पाणी वाहू लागेल.

भ्रष्टाचारी लोकांना मानसिक त्रास अर्थातच सोसावा लागत असतो. अंतर्मनाच्या खोल गाभाऱ्यात
ा कुठेतरी खोल वाटत असतेच की आपण काही हे बरोबर करीत नाही. मग त्यांना हा सल उच्च रक्तदाब, अंतर्व्रण, हृदयविकार, असले व्याधीविकार भोगायला लावतो. कारण शरीरावर मनाच्य
ा भ्रष्ट आचारांचा लगेच परिणाम होतो. शरीर खोटे बोलत नाही आणि बोलू शकत नाही. भ्रष्टाचारी असली तरी ती माणसेच आहेत. आणि आपलेच भाईबंद आहेत. समाजातला एकही माणूस अस्वस्थ, बेचैन, असंतुष्ट असला की कमीतकमी त्याच्या आसपासचे आणि सहवासातील लोक कमी जास्त प्रमाणात तसेच होतात. समाजातील अशा लोकांचे प्रमाण कमीत कमी असेल तर सर्वनाश तितका दूर राहील.

भ्रष्ट हा शब्द "नापास" ह्या शब्दासारखाच आहे. एखादा मुलगा नापास होतो ह्याचाच अर्थ आपण सर्वजण त्याला समजून घेऊ शकलो नाही, समजावू शकलो नाही. त्यामुळे त्याला समजले नाही आणि तो नापास झाला. एखाद्याला नापास म्हणून हिणवणे हे स्वतःलाच हिणवण्यासारखे आहे.

भ्रष्ट कोणी कोणाला म्हणावे ? प्रत्येकाची हांव वेगवेगळी आहे. प्रत्येकाच्या मर्यादा वेगवेगळ्या आहेत. प्रत्येकाने जाणीवपूर्वक भ्रष्टाचार केला पाहिजे त्याशिवाय त्यातील फोलपणा कळणार नाही.

५

आज आपण शहामृगाप्रमाणे वाळूत तोंड खुपसून बसलो आहोत. सर्रास भ्रष्टाचार करतो तर आहोतच पण सरळ जाहीररीत्या कुणी कबुलीही देत नाही की " होय आम्ही भ्रष्ट आहोत". आपल्याला एखादा रोग झाला आहे हे मान्य करणे ही बरे होण्याची पहिली पायरी. रोगच नाही म्हणणे म्हणजे सडत मरायला आमंत्रण देणे आहे. आपले शेपूट वाकडे आहे आणि नीतिमत्तेच्या नळीत घालून आपण ते सरळ करायचा आटोकाट प्रयत्न करतो आहोत ते सरळ होणार नाही हे लवकर मान्य करायला हवे. ही नळी पण एकच आहे म्हणजे आपण आपल्या शेपटाची काढून दुसऱ्याच्या शेपटाला घातली की इकडे आपले शेपूट वाकडे होते आहे. तर टाकून द्या ती नळी. सरळ आपले वाकडे शेपूट हलवत हिंडायची काय चोरी आहे काय ? भले साऱ्या जगात लांच खात नसतील असे मानूयात. पण आम्ही देवादिकांपासून सर्वांना लांच देतच जर लहानाचे मोठे होत असू तर आपली व्यवस्था भिन्न आहे हे मानण्यात अडचण कुठली ?मुळात नवस करणे, परमेश्वराच्या स्तुतीपर आरत्या ओवाळणे हे भ्रष्ट व्यवहार आहेत आणि आपल्या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहेत हे कुणी मान्य करेल की नाही ? माझे हे काम होऊ दे मी तुला नारळ फोडीन असे आपण करतो की नाही ? देवाला चार आणे ( त्याचेच ) देऊन वर चार हजार रुपयाची नोकरी मागणारे आपण साहेबाला चारशे रुपयाची लांच द्यायला कमी करणार नाही. परमेश्वराची स्तुती करणारे आपण परमेश्वरासमान अशा आपल्या साहेबाच्या आरत्या ओवाळणार आणि हां जी हांजी करणार की नाही ? कारण प्रमोशन त्याच्या हातात असते.

जरा द्वैतभाव दूर ठेवूयात. जगात संपूर्ण चांगले संपूर्ण वाईट असे कांही असूच शकत नाही. प्रकाश म्हणजे कमी अंधार आणि अंधार म्हणजे कमी प्रकाश असेच आहे. अनीति आहे म्हणून नीतीची चाड आहे. दुर्जन आहेत म्हणून सज्जनांची वाहवा. नाहीतर त्यांना विचारतो कोण ? दुर्जनांचे दुर्दैव त्यांच्या दुर्जनतेतच आहे. तर सज्जनांचे सुदैव त्यांच्या सज्जनपणातच आहे. ह्याची आपण सदैव जाणीव ठेवली पाहिजे. उगीच दुर्जनांना शिक्षा देऊन आपण आपला सामाजिक

अहंकार तेवत ठेवण्यात भूषण मानतो आहोत. दुर्जनांना शिक्षा असेल तर ती झालीच आहे. पण त्यांना त्यांच्या दुर्गतीतून बाहेर काढायला आपण सामाजिक नियम बदलायला हवेत. **निसर्गनिय म हे मानवाच्या नियमापेक्षा फार बलिष्ठ असतात.** त्यामुळे मानवी नियम हे जर



निसर्गनियमांच्या फार विरोधात गेले तर पदरी अपयशाशिवाय काहीही येत नाही. दारुबंदीविषयी जगातील यच्चयावत समाजांची मानहानी झाली आहे. कुठेही दारुबंदी टिकली नाही टिकणार ना ही. सारे जग शाकाहारी होणार नाही. सारे जग ब्रह्मचर्यव्रत घेणार नाही आणि सर्व जग आपली संग्रही वृत्ती; मग ती पैशाची असो की चीजवस्तूंची, सोडणार नाही. कामाचा मोबदला तिथल्या तिथे घेणे हा निसर्गनियम आहे त्याला लांच म्हणा किंवा काही म्हणा नंतर महिन्याने मिळणाऱ्या पैशात ती गोडी नसते. चोरलेला पेरू गोड लागतो पण चोरी केलेलीही बरी वाटत नाही. मग चोरी करायची वेळ आणू नका आधीच पेरू द्या.

प्राणी जगतात भ्रष्टाचार कसा चालतो ते आपण डिस्कव्हरीवर पाहतो. एका प्राण्याने जीव तोडून पकडलेली शिकार दुसरेच प्राणी झुंड करून पळवून नेतात मनुष्य प्राणी काह ी फार वेगळा नाही. माकडांपासून सगळेच पुढे उत्क्रांत होत गेले नाहीत तर काही माकडच राहि ले  आणि माणसाचे कपडे घालून वावरू लागले. त्यामुळे भ्रष्ट आचाराची संवय तशीच राहिली.

मुळात कुणी कुणाच्या आचरणावर नजर ठेवतो आहे ही कल्पनाच गैर आहे. प्रत्येक जण फक्त आपल्या स्वतःच्या आचरणावर नजर ठेवू शकतो. क्रिकेटमध्ये ज्याप्रमाणे आपल्या बॅटला बॉल लागून गेला कां नाही हे फक्त फलंदाजालाच कळू शकते. पूर्वी ते आपणहून चालले जात आता पंचसुध्दा कमी पडल्यामुळे यंत्रे माणसाच्या वागणुकीवर डोळा ठेवू लागली आहेत. त्याचप्रमाणे आपण भ्रष्ट आहोत की नाही हे आपल्यालाच कळणार त्यासाठी दुसऱ्या कुणाचे प्रशस्तीपत्र नको. वैयक्तिक आयुष्यातील भ्रष्ट आचार संपले की सामाजिक भ्रष्टाचार संपतो. भूक लागलेली नसताना खाणे हा भ्रष्ट आचार आहे असे कळले की जरूर नसताना पैशाचा हव्यास करणे हाही भ्रष्ट आचार आहे असे समजणे सोपे जाते. हळूहळू आपण समंजस होतो की सामाजिक भ्रष्टाचार कधीही संपणार नाही पण त्याची पातळी कालौघात कमी जास्त होत राहील. आपल्या

आयुष्यात आपण कसे राहिलो हेच आणि एवढेच महत्वाचे.